RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक ६] मंगळवार, मार्च १७, २०२६/फाल्गुन २६, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये २३.००

असाधारण क्रमांक ८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.— महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.	**पृष्ठे** १-२

दिनांक ९ मार्च २०२६ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सतिश वाघोले,
सचिव (विधि विधान),
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

सन २०२६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक १७ मार्च २०२६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६५ चा महा. ४०.

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता;

२०२५ चा महा. अध्या. १३.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) अधिनियम, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २६ डिसेंबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ५१अ-१अ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ५१अ-१अ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९६५ चा महा. ४०.

"(३अ) (एक) जर कोणतीही व्यक्ती, अध्यक्ष म्हणून व परिषद सदस्य म्हणून निवडून आली तर, तिला, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता येतील.

(दोन) एकाच वेळी अध्यक्षाचे व परिषद सदस्याचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस, एकतर, अध्यक्ष म्हणून किंवा परिषद सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईलः

परंतु, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल.".

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याच्या कलम ३४१ब-१अ ची सुधारणा.

३. मुख्य अधिनियमाच्या कलम ३४१ब-१अ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

"(३अ) (एक) जर कोणतीही व्यक्ती, अध्यक्ष म्हणून व पंचायत सदस्य म्हणून निवडून आली तर, तिला, एकाच वेळी, दोन्ही पदे धारण करता येतील.

(दोन) एकाच वेळी अध्यक्षाचे व पंचायत सदस्याचे पद धारण करणाऱ्या व्यक्तीस, एकतर, अध्यक्ष म्हणून किंवा पंचायत सदस्य म्हणून केवळ एकच मत देता येईलः

परंतु, समसमान मते पडल्यास, अध्यक्षास निर्णायक मत देता येईल.".

सन २०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ याचे निरसन व व्यावृत्ती.

४. (१) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगीक नगरी (तिसरी सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०२५ चा महा अध्या. १३.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.